# प्रथम, द्वितीय वर्षाचे निकाल जाहीर होणार

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठ प्रथम व द्वितीय वर्षांचे प्रलंबित असणारे निकाल टप्प्याटप्प्याने जाहीर होणार आहेत. याबाबत शिवाजी विद्यापीठ प्रशासनाने महाविद्यालयांना आदेश काढले आहेत. त्यामुळे प्रथम व द्वितीय वर्षातील निकालाचा प्रश्न सुटणार आहे. महाविद्यालयांबरोबरच अधिविभागातील प्रलंबित निकालही जाहीर होणार आहेत.

दि.२२ मार्चपासून कोरोनामुळे देशभरात लॉकडाऊन सुरू झाले. यानंतर राज्यातील विविध महाविद्यालये तसेच विद्यापीठ स्तरावरील परीक्षा रद्द करण्यात आल्या. परीक्षाच न झाल्याने विद्यार्थ्यांच्या निकालाबाबत संभ्रम निर्माण झाला. तृतीय वर्षाच्या परीक्षेबाबत अजून कोणताच निर्णय झालेला नाही. त्यामुळे राज्य शासनाने प्रथम व द्वितीय वर्षाच्या परीक्षांचे निकाल जाहीर करण्याच्या सूचना विद्यापीठांना दिल्या आहेत.

## टप्प्याटप्प्याने निकाल : डॉ. गुरव

कोरोनामुळे महाविद्यालये बंद होती. विद्यार्थ्यांच्या परीक्षा होऊ शकल्या नाहीत. निकाल कशा पद्धतीने जाहीर करायचे, याबाबत डॉ. कणसे समिती नेमली होती. या समितीने दिलेल्या सूचनांप्रमाणे हा निकाल जाहीर करण्याची प्रक्रिया टप्प्याटप्प्याने सुरू होणार आहे, असे परीक्षा विभागाचे प्रभारी संचालक डॉ. आर.व्ही.गुरव यांनी सांगितले.



# शिवाजी विद्यापीठ प्रशासनाचे आदेश

प्रथम वर्षातील विद्यार्थ्यांना प्रथम सत्रात व द्वितीय वर्षातील विद्यार्थ्यांना त्यांच्या तृतीय सत्रात मिळालेल्या गुणांच्या आधारे हे निकाल जाहीर होणार आहेत. प्रॅक्टिकलचे गुणही महाविद्यालयांकडून देण्यात येणार आहेत. त्यामुळे प्रथम व द्वितीय वर्षातील विद्यार्थ्यांच्या निकालाचा प्रश्न सुटणार आहे. महाविद्यालयांबरोबरच शिवाजी विद्यापीठ अधिविभागातील प्रलंबित निकालही लागणार आहेत. विद्यापीठ कार्यक्षेत्रात २९३ महाविद्यालये आहेत. तसेच विद्यापीठात ३६ अधिविभाग आहेत. यामध्ये पावणेदोन लाख विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. या सर्वांचे निकाल जाहीर होणार आहेत.

# विद्यापीठाचे निकाल आजपासून जाहीर होणार

कोल्हापूर : कला, वाणिज्य आणि विज्ञान विद्याशाखांच्या प्रथम आणि द्वितीय वर्षाचे निकाल शिवाजी विद्यापीठाकडून आज, गुरुवारपासून ऑनलाईन जाहीर करण्यात येणार आहेत. कोरोनाच्या पार्श्वभूमीवर राज्य शासनाने केलेल्या मार्गदर्शक सूचनांचे पालन करुन विद्यापीठाकडून निकाल जाहीर केले जाणार आहेत, अशी माहिती विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी डॉ. आर. व्ही. गुरव यांनी बुधवारी दिली. दरम्यान, विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रात विविध अभ्यासक्रमांचे प्रथम आणि द्वितीय वर्षाचे एक लाख ४० हजार विद्यार्थी आहेत.